मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 26 मे 2024 | पान- 1

# रुफटॉप हॉटेल, पब, रेस्टॉरंटवर पुन्हा कारवाई

## अनधिकृत बांधकामे, फायर ऑडिटची तपासणी : 43 पैकी 31 रुफटॉप हॉटेलवर कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुण्यातील 'हिट अँड रन' प्रकरणानंतर पिंपरी-चिंचवड शहरातील रुफटॉप हॉटेल्स, पब, रेस्टॉरंटमधील अनधिकृत बांधकामे, फायर ऑडिट या अनुषंगाने पुन्हा तपासणी करून अनधिकृत असलेल्या हॉटेलवर कारवाई करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील ४३ पैकी ३१ रूफटॉप हॉटेलवर कारवाई झालेली आहे. काही हॉटेलमालकांनी नियमितीकरणाचे प्रस्ताव दिले आहेत. आणखी १२ रुफटॉप हॉटेल्सवर कारवाई बाकी आहे. तसेच शहरात पुन्हा एकदा रुफटॉप हॉटेल, पब, रेस्टॉरंटचे सर्वेक्षण करून जे अनधिकृत असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात वाकड, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, चिंचवड, निगडी, स्पाइन रोड, भोसरी या भागांसह महापालिका हद्दीलगत असलेल्या परिसरात मोठ्या संख्येने रुफटॉप हॉटेल्स तयार झाली आहेत.

इमारतींच्या टेरेसवर हॉटेल्स चालवले जातात. या हॉटेल्समध्ये ड्रिंक्स, जेवण अशा सर्व गोष्टी मिळतात. हॉटेल्समध्ये मोठ-मोठे किचन आहेत. मात्र, हे सर्व करताना एकाही हॉटेलमालकाने रुफटॉप हॉटेल्ससाठी परवानगी घेतली नव्हती. कोणाकडेही बांधकाम परवाना नाही, अग्निशमन विभागाचा 'ना हरकत' दाखला नाही. महापालिकेच्या अग्निशमन विभागाने काही महिन्यांपूर्वी केलेल्या सर्वेक्षणात शहरात ४८ रुफटॉप हॉटेल्स असल्याचे निदर्शनात आले होते. तर बांधकाम विभागाकडून केलेल्या सर्वेक्षणात ४३ रूफटॉप हॉटेल आढळून आली होती.

त्यानुसार अग्निशमन विभागाने या हॉटेलमध्ये अग्निशमन यंत्रणा नसल्याने त्यांना नोटीस बजावली. त्यानंतर काही हॉटेल बंद करण्यात आले. मात्र, काहींनी नोटिशीला उत्तर दिले नाही. त्यानंतर महापालिकेने पुन्हा एकदा सर्वेक्षण केले. त्यात २१ अनधिकृत रुफटॉप हॉटेल्स आढळून आली होती. बांधकाम विभागाकडून रूफटॉप हॉटेलवर केलेल्या कारवाईत ३१ हॉटेलवर अनधिकृत बांधकामे निष्कासित केली होती, तर उर्वरित १२ अद्याप कारवाई करणे नियमितीकरणाचे ६ प्रस्ताव, न्यायप्रविष्ट २, बॅंक सील १ आणि बंद २, मनपा करारनामा १ अशी एकूण ४३ रुफटॉप हॉटेल्सवर कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, शहरातील सर्व रुफटॉप हॉटेलच्या अनधिकृत असलेल्या बांधकामावर कारवाई केलेली आहे. ही कारवाई महापालिकेने मागील सहा महिन्यांत केली आहे. त्यानंतरही आता रुफटॉप हॉटेल्सवर सरसकट सर्वेक्षण करून पुन्हा एकदा कारवाई करण्याचे धोरण महापालिकेने हाती घेतले.

मात्र, हॉटेल मालक व अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या बैठकीनंतर ते काही नियम व अटी टाकून अधिकृत करण्यात आले होते. त्यामध्ये ४३ रुफटॉप हॉटेल्सना 'अधिकृत'चे दाखले महापालिकेने दिले होते. मात्र, महापालिकेने घालून दिलेल्या अटी व शर्ती न पाळताच रुफटॉप हॉटेल्स बिनबोभाट सुरू आहेत.

> शहरात एकही अनधिकृत रुफटॉप हॉटेल नाही. मात्र, काहींनी टेरेसवर ग्राहकांना बसण्याची परवानगी घेतली आहे. ही परवानगी घेतानाही त्यांची बैठक व्यवस्था व बांधकाम असणे आवश्यक आहे. मात्र, अनेक हॉटेलचालकांनी टेरेसवर जास्त ग्राहकांना बसता यावे, यासाठी परवानगी व्यतिरिक्त बैठक व्यवस्था व तेथील सुविधा वाढवल्या आहेत. अशी हॉटेल्स अधिकृत असली, तरी नियमांची अंमलबजावणी न केल्याने त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. फायर ऑडिट व अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.
> - शेखर सिंह, आयुक्त, महापालिका, पिंपरी-चिंचवड.

# अनधिकृत होर्डिंगनंतर आता मोबाइल टॉवर रडारवर

## शहरात विविध कंपन्याचे 923 मोबाइल टॉवर : 533 टॉवर अधिकृत तर 390 टॉवर अनधिकृतपणे उभे

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या बांधकाम विभागाने केलेल्या सर्व्हेक्षणात शहरात विविध कंपन्याचे ९२३ मोबाइल मनोरे (टॉवर) असल्याचे समोर आले. त्यात ५३३ मनोरे अधिकृत तर ३९० मनोरे अनधिकृतपणे उभे आहेत. होर्डिंग दुर्घटनेनंतर या अनधिकृत मोबाइल मनोऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

तंत्रज्ञानाचा दिवसेंदिवस वापर वाढला असतानाच पिंपरी-चिंचवड शहरात मोबाइल मनोऱ्यांची संख्याही झपाट्याने वाढली आहे. मोबाइल, इंटरनेट नेटवर्किंगचा वापर वाढला असल्याने कंपन्यांनी शहरातील विविध भागांतील इमारतींवर आणि नागरी वस्तीत मोबाइल मनोरे उभारले आहेत. महापालिकेच्या बांधकाम विभागाने केलेल्या सर्व्हेक्षणात विविध कंपन्यांचे ९२३ मोबाइल मनोरे शहरात असल्याचे समोर आले. त्यात ५३३ अधिकृत तर ३९० मनोरे अनधिकृतपणे उभे आहेत. महापालिकेला शासनाच्या



धोरणामुळे नामवंत कंपन्यांच्या मोबाइल मनोऱ्यांवर कोणतीही कारवाई करता येत नाही. तसेच काही मोबाइल मनोऱ्यांची करसंकलन विभागाकडून कर आकारणी देखील केलेली नाही. तर, काही कंपन्या मोबाइल मनोऱ्यांवर लावलेल्या कर आकारणी विरोधात न्यायालयात गेल्या आहेत. त्यामुळे अनधिकृत मोबाइल मनोरे उभारून कंपन्याकडून कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय केला जात आहे. होर्डिंग दुर्घटनेनंतर अनधिकृत मोबाइल मनोरे देखील चर्चेत आले आहेत. अनधिकृत मोबाइलच्या लोखंडी मनोऱ्यांपासून देखील होर्डिंगसारखा धोका संभवतो.

याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, मोबाइल मनोऱ्यांबाबत बैठक झाली आहे. मनोरे उभारलेल्या कंपन्यांना स्थापत्यविषयक लेखापरीक्षण करण्यास सांगितले आहे. मनोरा आणि इमारतीच्या मजबुतीसंदर्भात स्थापत्यविषयक स्थिरता प्रमाणपत्र सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार १५ दिवसांच्या मुदतीत पूर्तता करणे अपेक्षित आहे. तसे न केल्यास मोबाइल मनोऱ्यांवर कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करून राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल. शासनस्तरावर मोबाइल मनोऱ्यांवरील कारवाईचे अधिकार आहेत.

# अनधिकृत पब, हॉटेलवर पुन्हा कारवाई

## अनधिकृत 15 हजार 925 चौरस फूट बांधकाम जमीनदोस्त : बेकायदा हॉटेलवर गुन्हे

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघातात दोघांचा जीव गेल्याने महापालिका प्रशासनाला जाग आली असून त्यांनी अनधिकृत पब, हॉटेल, रेस्टॉरंटवर कारवाई सुरू केली आहे. महापालिकेने मुंढवा येथील वॉटर्स, ओरिला, अनवाईट, हिगोणे, कार्निवल बॉटल फॉरेस्ट, मासा, व चिलीज तसेच घोरपडी येथील क्यू बार पेंटहाऊस, स्पाईस फॅक्टरी व आकारी या हॉटेल /रेस्टोरंटवर गुन्हा दाखल करावा, अशी तक्रार पोलिसांकडे केली होती. त्यानुसार मुंढवा पोलीस ठाण्यात अनधिकृत हॉटेलवर गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत अनधिकृत १५,९२५ चौरस फूट इतके बांधकाम पाडले.



महापालिकेने धाडस दाखवत अनधिकृत पब, बार आणि रूफ टॉप हॉटेलवर कारवाई सुरू केली आहे. मुंढवा , कोरेगाव पार्क , घोरपडी , पुणे स्टेशन , घोरपडी, कल्याणीनगर विमाननगर या भागातील एकूण ५४ अनधिकृत हॉटेल, पब, रेस्टॉरंटवर कारवाई केली होती. त्यानंतर आज महापालिकेने १४ ठिकाणांवरील अनधिकृत हॉटेलवर कारवाई करत १५,९२५ चौरस फूट इतके बांधकाम पाडले. कारवाईनंतर महापालिकेकडून पोलिसांकडे या हॉटेल विरोधात पोलीस ठाण्यात तक्रारी दिल्या आहेत. त्यानुसार पोलिसांकडून महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम (एमआरटीपी-५२) या कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे. बांधकाम विकास विभागाने शुक्रवारी मुंढवा, कोरेगाव पार्क, एरंडवणा, सदाशिव पेठ या भागामधील हॉटेल, रेस्टॉरंवर कारवाई केली. कारवाईसाठी एकूण २ गटात विभागणी करण्यात आली होती. रेस्टॉरंट, हॉटेल यांचे साईड मार्जिनमधील अनधिकृत केलेल्या शेड्स यापूर्वी कारवाई करून काढून घेण्यात आलेल्या होत्या. पुन्हा शेड्सची उभारणी केली असल्यामुळे कारवाई केल्याचे महापालिकेने सांगितले.

### या हॉटेलवर कारवाई

» साऊथ किचन एक्सप्रेस, जोशी किचन , कोल्हापूर फेमस एक्सप्रेस, हॉटेल ग्लोबल पंजाब, हॉटेल समुद्र, कॉटन किंग, पापारिकाज किचन, हॉटेल निसर्ग, साईनाथ खानावळ, मोर , सिल्क रुट स्टोर, ब्रेऊ कल्पर, मंड हाउस गील, बोहो बोहो द कॅफे, डंम्बोन, ढाबा शाबा, कार्निवल, विगबुल.

# पब आणि रूफ टॉपवर नजर ठेवण्यासाठी लाईव्ह वेबकास्टिंग!

## पुण्यात राबविला जाणार पायलट प्रोजेक्ट : जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांचा राज्य उत्पादन शुल्क विभागाला प्रस्ताव

**पुणे | प्रतिनिधी**

पब, हॉटेल्स, बार आणि रूफ टॉप हॉटेल्स मध्यरात्रीनंतर दीड वाजता बंद करण्यासंदर्भात वेळेचे बंधन आहे. परंतु ही वेळ पाळली जात नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पब, हॉटेल्स, बार आणि रूफ टॉप हॉटेल्सवर लाईव्ह वेब कास्टिंगद्वारे करडी नजर ठेवली जाणार आहे. पुणे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांना विविध उपाययोजनेअंतर्गत राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाला सूचना केली आहे. त्यावर गांभीर्याने विचार करून हा निर्णय अमलात आणला जाणार आहे.



पुण्यातील कल्याणीनगर भागात बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवाल याच्या अल्पवयीन मुलाने दारू पिऊन अतिवेगाने गाडी चालवित दुचाकीला उडविले. या अपघातामध्ये दुचाकीवरील दोन अभियंत्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलांना कोणतीही खातरजमा न करता मद्य पुरविण्यात आल्याची माहिती समोर आली होती.

जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे म्हणाले, "कल्याणीनगरमधील त्या दुर्घटनेनंतर पुणे शहरासह जिल्ह्यातील सर्व पब, परमिट रूम, बारची तपासणी करण्याच्या सूचना विविध सामाजिक कार्यकर्ते, नागरी समाज आणि संघटनांनी केल्या होत्या. त्यानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने पुणे शहरातील सर्व पब्ससह इतर परमिट रूमची विशेष तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. परवानाधारक हॉटेल, पबमध्ये अल्पवयीन मुलांना कोणत्याही विदेशी मद्याची विक्री करण्यात येऊ नये. मध्यरात्री १.३० नंतर कोणत्याही विदेशी मद्याची विक्री करण्यात येऊ नये. महिला वेटर्समार्फत रात्री ९.३० नंतर कोणतीही विदेशी दारू सर्व्ह करू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

विविध उपाययोजनांमध्ये सर्व पब, रूफ टॉप हॉटेल्सकडून वेळेचे बंधन पाळले जाते की नाही, यावर नजर ठेवण्यासाठी वेब लाईव्ह कास्टिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क, पुणे महापालिका, पुणे व ग्रामीण पोलीस प्रशासन, पीएमआरडीए प्रशासन यांच्यासोबत यासंदर्भात चर्चा सुरू आहे. पब, रूफ टॉप, लाउंज बार हॉटेल असोसिएशननेदेखील स्वयंनियमन करण्याचे आदेश दिले आहेत."

महापालिका प्रशासनाकडून देण्यात आलेल्या परवानग्या, राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून यापूर्वी झालेल्या दंडात्मक कारवायांचा आढावा घेतला जात आहे. सर्व नियम आणि अटी पाळल्या आहेत का, याची खातरजमा केली जाईल. दंडात्मक कारवाई झाल्यानंतरदेखील जर नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळून आले तर परवाना निलंबित तसेच कायम रद्दची कारवाई केली जाईल," असेही जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी सांगितले.

### 40 परमिट रूम आणि बारचे परवाने रद्द

» कल्याणीनगर परिसरात रविवारी (दि. १९) पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास ही अपघाताची घटना घडली होती. त्यानंतर सतर्क झालेल्या जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. गेल्या तीन दिवसांमध्ये राज्य शुल्क विभागाने पहिल्या टप्प्यात पुणे शहरासह जिल्ह्यातील ३२ आणि दुसऱ्या टप्प्यात ८ असे एकूण ४० रूम आणि बारचे परवाने रद्द केले आहेत. त्यानुसार गेल्या तीन दिवसांपासून बार, पब तसेच परमिट रूमची तपासणी केली जात आहे. पुणे शहरासह जिल्ह्यातील आणखी काही परमिट रूम आणि बारचे परवाने रद्द करण्याची शक्यता आहे. जिल्हाधिकारी दिवसे यांच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आली आहे.

> “ सामाजिक कार्यकर्ते, नागरी समाज आणि संघटनांनी सुचवलेल्या विविध उपाययोजनांनुसार सर्व पब, रूफ टॉप हॉटेल्सकडून वेळेचे बंधन पाळले जाते की नाही, यावर नजर ठेवण्यासाठी वेब लाईव्ह कास्टिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क, पुणे महापालिका, पुणे व ग्रामीण पोलीस प्रशासन, पीएमआरडीए प्रशासन यांच्यासोबत यासंदर्भात चर्चा सुरू आहे.
> - डॉ. सुहास दिवसे, जिल्हाधिकारी.

# पालखी महामार्गावर वाहतूक कोंडी

## सहा किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा : दीड तासापेक्षा अधिक काळ वाहतूक कोंडीत प्रवासी अडकले

**पिंपरी | प्रतिनिधी**

लग्नसराईमुळे वाहतूक कोंडीत सापडण्याचा अनुभव आळंदीकरांना नवीन नाही. मात्र, आज आळंदीत एकही लग्न नसताना वाहनचालकांच्या बेशिस्तपणाचा मोठा फटका नागरिक व प्रवाशांना बसला. पिंपरी -चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील 90 मीटर रस्त्यावर सहा किलोंीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असल्याची अभूतपूर्व वाहतूक कोंडी पहायला मिळाली.

त्यामुळे घरी परतणारे चाकरमाने, विद्यार्थी व प्रवाशांना याचा मोठा त्रास सहन करावा लागला. वाहतूक शाखेचे कर्मचारी अनुपस्थित असल्याने ही कोंडी झाल्याचे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे होते.

लग्नपंढरी अशी आळंदीची राज्यभर ख्याती आहे. लग्नसराईची तिथी म्हणजे हमखास वाहतूक कोंडी असे समीकरणच बनले आहे. त्यामुळे लग्नतिथीच्यादिवशी आळंदीकर घराबाहेर पडणे शक्यतो टाळतात. तर चाकरमानेदेखील सकाळी वाहतूककोंडी सुरू होण्यापुर्वीच कामाल रवाना होतात. तर रात्री आठवाजेपर्यंत बऱ्यापैकी वातावरण निवळलेले असते.मात्र. आजची परिस्थिती नेमकी विरुद्ध पहायला मिळाली. दिवसभरात आळंदीत एकही लग्नसोहळा नसल्याचे चित्र होते.

मात्र, सायंकाळी साडे सहा वाजल्यापासून पुणे-आळंदी रस्त्यावर वाहतूक कोंडी व्हायला सुरुवात झाली. पुणे -आळंदी रस्त्यावर पालखी महामार्गावर आळंदीपासून सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या बालाजी मंदिरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याचे रात्री पहायला मिळाले. दीड तासापेक्षा अधिक काळ गाडीतच बसून रहायला लागल्याने बस व खासगी वाहनांमधील प्रवासी चांगलेच वैतागले होते. त्यातच उकाड्याने त्यामध्ये भर पडली होती.

काही ऊसवाहतूक करणारे वाहनचालक मागील वाहनांची फिकीर न करता विनारिफ्लेक्टर, विनाक्रमांकाची वाहने दामटत आहेत. विशेषत: ट्रॅक्टर-ट्रॉलीतून होणारी ऊसवाहतूक डोकेदुखी ठरत आहे. काही ट्रॅक्टरचालक मोठ्या आवाजात टेपरेकॉर्डरवर गाणी लावून महामार्गाच्या मधोमध ट्रॅक्टर चालवीत आहेत. त्यामुळे ओव्हरटेक करताना दुचाकीस्वारांसह चारचाकी वाहनचालकांची कसोटी लागत आहे. ट्रक व बैलगाड्यांबाबतीतही तसेच सुरू आहे.

महामार्ग अरुंद असल्याने रात्रीच्या वेळी वाहनांना महामार्गाचा अंदाज येत नाही. त्यातच महामार्गावर ठिकठिकाणी मोठ-मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे वारंवार अपघात घडत आहेत. यामध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागला, तर काहींना कायमचे अपंगत्व आलेले आहे. मात्र, अशी धोकादायक ऊसवाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना याची कोणतीच फिकीर नाही. त्याकडे पोलिस प्रशासनाचे देखील दुर्लक्ष आहे.



### वाहतूक शाखेचे कर्मचारी गाय

» वाहतूक कोंडी झाल्यानंतर नागरिकानी वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांचा शोध घतेला.ममात्र. हे कर्मचारी नसल्याचे पहायला मिळाले. तर वाहतूक शाखेच्या दोन महिला कर्मचारी रस्त्याच्या बाजूला उभ्या राहून वाहतूक कोंडीत अडकलेल्या नागरिकांची गंमत पाहत होत्या, अशी प्रत्यक्षदर्शीने माहिती दिली. याबाबत दिघी-आळंदी वाहतूक शाखेच्या अधिखाऱ्यांशी संपर्क न झाल्याने त्यांची प्रतिक्रिया समजू शकली नाही.

### स्थानिक तरुणांचा पुढाकार

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील पालखी महामार्ग 90 मीटर रुंद असून, त्यामध्ये बीआरटी मार्ग, मुख्यरस्ता व सेवा रस्त्यांचा समावेश आहे. मात्र, या सर्वच रस्त्यांवर वाहने थांबून राहिल्याने नेमके अघटीत काय घडले आहे? असा प्रश्न स्थानिक तरुणांना पडला. त्यामुळे हे तरुण वाहतूक कोंडी फोडण्यासाठी सरसावले. रात्री उशिरापर्यंत हे तरुण वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्नशीलअ सल्याचे चित्र पहायला मिळाले.

---

# इंद्रायणी बियाण्यांचे शेतकऱ्यांना करणार वाटप

## शेतकऱ्यांना एकरासाठी प्रत्येकी 25 किलो या हिशोबाने 1000 किलो बियाण्याचे वाटप

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ ॲग्रोच्या माध्यमातून व फॉर्मटच बायोटेक प्रोड्युसर कंपनी लिमिटेड या शेतकरी संस्थेच्या सहकार्याने पहिल्या पिढीचे इंद्रायणी भात बियाण्यांचे वाटप दि.२७ मे रोजी शेतकऱ्यांना पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक वडगाव मावळ शाखेत करण्यात येणार आहे. तालुक्यातील ३० ते ३५ शेतकऱ्यांना एक एकरासाठी प्रत्येकी २५ किलो या हिशोबाने १००० किलो बियाण्याचे वाटप करणार असल्याची माहिती मावळ ॲग्रोचे संस्थापक अध्यक्ष, सहकारमहर्षी माऊली दाभाडे यांनी दिली.

यावेळी बोलताना दाभाडे म्हणाले की, आम्ही मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी हे पहिले पाऊल उचलत आहे. आज शेतकऱ्यांना जे बियाणे मिळते ते तिसऱ्या पिढीच बियाणे आहे. आज पहिल्या पिढीचे बी शेतकऱ्यांना दिल्यानंतर त्यापासून पुढच्या वर्षी दुसऱ्या पिढीचे बी तयार होईल. ही मावळाच्या दृष्टीने अतिशय अभिमानाची बाब आहे, असे मावळ ॲग्रोचे संस्थापक अध्यक्ष सहकार महर्षी माऊली दाभाडे यांनी सांगितले.

जिल्ह्यात भात पिकांचे आगार असलेल्या वेल्हे तसेच पश्चिम हवेली तालुक्यात संकरित इंद्रायणी व इतर जातीच्या भाताची मोठ्या प्रमाणात लागवड केली जात आहे. त्यामुळे पारंपरिक प्रजातीच्या तांबसाळ, लागवड कमी होऊन हे वाण लुप्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पारंपरिक जातीच्या भाताचे जतन होण्यासाठी उपक्रम सुरू करण्यात आला आहे.



### पहिल्या पिढीचे बियाणे म्हणजे काय?

» शेतकऱ्यांना पहिला प्रश्न पडेल बिदर शीड पहिल्या पिढीचे बीज म्हणजे नेमकं काय? तर सुरुवातीला जे इंद्रायनीचे सुगंधित बियाणे होते तेच बिदर शीड म्हणजेच पहिल्या पिढीचे बीज होय.

### अशी असेल खरेदीची किंमत

» सेंद्रिय खताचा वापर करून तयार केलेल्या पहिल्या पिढीचे इंद्रायणी बीज (बियाणे) हे भात खरेदी प्रती किलो ४५ रुपये, सेंद्रिय खताचा वापर करून तयार केलेले इंद्रायणी भात खरेदी प्रती किलो ४० रुपये, तर इतर इंद्रायणी भात खरेदी प्रती किलो ३० रुपयेच्या दराने आमदार सुनील शेळके यांच्या सूचनेनुसार करण्यात येईल

# आरोपीचे आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांनाही अटक

## पुण्यातील कल्याणीनगर अपघात प्रकरणात ट्विस्ट : तपास गुन्हे शाखेकडे वर्ग

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील कल्याणी नगर भागात एका अल्पवयीन मुलाने पोर्श या महागड्या कारने दोघांना धडक दिली. यात दोघांचा मृत्यू झाला. दोन निरपराधांचा बळी घेतल्यानंतर या अल्पवयीन मुलाला अटक करण्यात आली होती. मात्र अवघ्या 15 तासांमध्ये त्याला जामीन मिळाला. ज्याचे पडसाद सर्व स्तरातून उमटले आहेत.

मात्र, जनतेने आवाज उठवल्यामुळे जामीनावर सोडलेल्या बड्या बिल्डरच्या अल्पवयीन मुलाचा जामीन रद्द करण्यात आला आहे. या प्रकरणी अल्पवयीन मुलाचे वडील, कोझी व ब्लॅक पबचे मालक आणि कर्मचारी यांची शुक्रवारी (ता.24 ) न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. न्यायालयाने आरोपींना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

यानंतर आता पुण्यातील कल्याणीनगर अपघात प्रकरणात मोठा ट्विस्ट समोर आला आहे. आज पोलिसांनी अल्पवयीन आरोपीचे आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांनाही अटक केली आहे. अल्पवयीन आरोपीचे वडिल विशाल अग्रवाल पोलीस कोठडीत आहेत. त्यानंतर पोलिसांनी आजोबा सुरेंद्र अगरवालच्याही मुसक्या आवळल्या आहेत. कार ड्रायव्हरला धमकी देणे आणि डांबून ठेवल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने शुक्रवारी रात्री उशिरा ही कारवाई केली.



### नागरिकांमध्ये संतापाची लाट

» राज्यसह देशभरात गाजलेल्या कल्याणीनगर अपघात प्रकरणाचा तपास अखेर सहा दिवसानंतर पुणे गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. रविवारी (दि १९ ) झालेल्या अपघातात अल्पवयीन मुलाने भरधाव वेगाने मोटार चालून दोघा अभियंताचा जीव घेतला होता. त्यानंतर संपूर्ण राज्यभरात नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली होती.याप्रकरणी येरवडा पोलिसांकडून तपास करण्यात येत होता. मात्र अपघात प्रकरणात राजकीय हस्तक्षेपमुळे पोलिसांवरील दबाव वाढत होता

### प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग

» कल्यानीनगर अपघात प्रकरण तपास येरवडा पोलिसांकडून सहा दिवसांनी गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. दरम्यान, अपघातानंतर नागरिकांकडून संतप्त प्रतिक्रिया दिल्या होत्या. त्यामुळे वाढता दबाव टाळण्यासाठी पुणे पोलिसांनी हा तपास गुन्हे शाखेकडून करण्याचा निर्णय घेतला. अपर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील तांबे हे या प्रकरणाचा तपास करनार आहेत.

येरवडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वनाथ तोडकरी हे घटनास्थळी दाखल झाले होते. तसेच तोडकरी यांनी या अपघाताची माहिती पोलीस निरीक्षक राहुल जगदाळे यांना दिली होती.

यानंतर जगदाळे हे सुद्धा घटनास्थळी आले होते. घटनास्थळी प्रत्यक्षदर्शनी अल्पवयीन कार चालकाला चोप दिला होता. नियमानुसार अशा वेळी पोलिसांनी त्याला रुग्णालयात घेऊन जायला हवे होते. मात्र तेथे उपस्थित असणाऱ्या जगदाळे आणि तोडकरी हे त्याला येरवडा पोलीस ठाण्यात घेऊन गेले.

तसेच याप्रकरणाची माहिती पोलीस कंट्रोल रूम आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यास द्यायला हवी होती ती दिली नाही. तसेच नाईट राऊंडवर असलेले पोलीस उपायुक्त संदीप गिल यांनाही अपघाताची माहिती दिली नाही. त्यांच्या या कृत्यामुळे पोलीसांच्या कार्यक्षमतेवर आणि तपासावर संशय निर्माण झाला होता.

अपघात प्रकरणात कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक (गुन्हे) राहुल जगदाळे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वनाथ तोडकरी असे निलंबित करण्यात आलेल्याची नावे आहेत. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आदेश दिला आहे.

# पब संस्कृतीला उच्चपदस्थ अधिकारी राजकीय नेत्यांचा वरदहस्त

## कॉन्सर्ट, पार्टींसाठी मोफत निमंत्रण : नातेवाईकांनाही व्हीआयपी सेवा पार्टीला नियमित हजेरी

**पुणे | प्रतिनिधी**

कायदा सुव्यवस्था आणि शहराचे सामाजिक भान, दीर्घक़ालीन धोरणांच्या माध्यमातून शहराच्या विकासाला हातभार लावण्याची जबाबदारी असलेल्या उच्चपदस्थ अधिकारी तसेच राजकीय नेत्यांच्या वरदहस्तामुळे गेल्या तीन ते चार वर्षांत शहरात पब संस्कृती अक्षरश: बोकाळली आहे. त्याची अनेक उदाहरणे शहरभर अनेकदा दिसून येतात.

मात्र, मोठ्य साहेबांचा आश पब चालकांकडून बॉलीवूडच्या बड्या कलाकारांचे कॉन्सर्ट, पेज थ्री पार्टी, दिवाळी पार्टी, नवीन वर्षाच्या स्वागताच्या पार्टीज् आयोजित करून पैसे कमावले जातात. अशा वेळी नियमांच्या उल्लंघनामुळे होणाऱ्या कारवाईपासून बचाव करण्यासाठी या मोठ्या अधिकाऱ्यांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना हजारो रुपयांची व्हीआयपी तिकिटे मोफत दिली जातात. अशा अधिकाऱ्यांचे काही “हस्तक’ शहरात असून त्यांच्या माध्यमातून हे नियोजन केले जाते. त्यामुळे काहीही झाले तरी, आपल्यावर कारवाई होणार नाही याची खात्री असल्याने शहरात पब संस्कृती वाढलेली असल्याचे चित्र आहे.

शहराचा उच्चभ्रू भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोरेगाव पार्क परिसरात आतापर्यंत पब संस्कृती होती. मात्र, त्या सोबतच आता कल्याणीनगर, मुंढवा, घोरपडी, खराडी, विमाननगर भागातही पब आणि रात्री उशिरापर्यंत चालणारे हॉटेल वाढले आहेत. मात्र, त्यांनी नियमबाह्य कामे केली, तरी केवळ मोठे अधिकारी आणि राज्यातील बडे नेते त्यांच्या कार्यक्रमाला हजेरी लावत असल्याने त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याचे चित्र आहे.

काही महिन्यांपूर्वी शहरातील अशाच एका पब चालकाने हिंजवडी येथे एका गायकाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास राज्यातील एका बड्या नेत्याचे नातेवाईक तसेच शहरातील अनेक मोठ्या अधिकाऱ्यांचे कुटूंब हजर होते. या कार्यक्रमामुळे हिंजवडी भागात जवळपास तीन ते साडेतीन तास वाहतूक कोंडी झाली. मात्र, आयोजकांवर कारवाईचा साधा चकार शब्दही काढण्यात आला नव्हता.



### पार्टींला नियमित हजेरी

» शहरातील काही पब चालकांकडून शनिवार, रविवार, नवीन वर्ष, नाताळ , दिवाळी या कालावधीत मोठमोठ्या पार्टीचे आयोजन केले जाते. अशा ठिकाणी हे अधिकारी नियमित हजेरी लावतात. त्यानंतर आयोजक स्वत: हे फोटो सोशल मीडियावर शेअर करतात. तर नंतर हेच पबचे चालक मालक हे फोटो संबंधित प्रशासकीय यंत्रणांच्या खालच्या अधिकाऱ्यांना पाठवतात. त्यामुळे आपल्याच साहेंबावर कारवाई कशी करणार, या भीतीने बेकायदेशीर पबवर कारवाई करण्यास टाळाटाळ होते.